ग्रामपंचायतीनी ई-निविदा प्रक्रिया
राबवितांना घ्यावयाची दक्षता.

**पंचायत विभाग**
**परिपत्रक क्रमांक जिपवा/पंचा./१९८० /२०१९.**
**कार्यालय जिल्हा परिषद वाशिम**
**दिनांक -१८ /०४/२०१९.**

**वाचा-**

१. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.संकिर्ण २०१०/प्रक्र.१७२/पंरा-७ दिनांक १९ ऑक्टोंबर २०११.
२. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.निविदा-२०१४/प्रक्र२६०/परा-७ दिनांक २७ मे २०१५.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंसं/नस्ती-२०१२प्रक्र२७३/३९ दिनांक २६ नोव्हेंबर २०१४.
४. शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग क्र.निविदा-२०१४/प्रक्र१६४पंरा-७ दिनांक १५ जुलै २०१४.
५. शासन परिपत्रक सार्व.बांधकाम विभाग क्र.सिओएम-२०११/प्रक्र/११/२०११संगणक कक्ष दिनांक ८-१२-२०१४
६. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.झेडपीए-२०१५ प्रक्र.१०/वित्त व दिनांक २५ मार्च २०१५
७. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग संकीर्ण-२०१६/प्रक्र.२१५/उद्योग-४ दिनांक २४ ऑगष्ट २०१७

**प्रस्तावना :-** 15/04/19

पंचायतीराज संस्थांमध्ये विविध विकासात्मक कामे व विकास कामांसाठी लागणाऱ्या सेवा तथा वस्तुंची खरेदी यासाठी दिनांक १ जानेवारी २०१२ पासून ई-निवीदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे संदर्भीय दिनांक १९/१०/२०११ च्या शासन निर्णयान्वये बंधनकारक करण्यात आले आहे. परंतू असे निदर्शनास आले की अनेक ग्रामपंचायती विहीत प्रक्रियेचा अवलंब करीत नाहीत यातुन अनेक अनियमितता घडत आहेत. ह्या बाबी घडुनयेत म्हणुन खालील प्रमाणे सुस्पष्ट सुचना या परिपत्रकाद्वारे निर्गमीत करण्यात येत आहेत. वाशिम जि.प.अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींनी याचे काटेकोर पालन करावे.

अ- ग्रामपंचायतींनी सर्व प्रकारचे इमारत बांधकाम, पाणी पुरवठा योजना, नाली/गटारे बांधकाम, संरक्षक भिंती, समाज मंदीर, सभागृह, अशा विविध विकासात्मक स्वरुपाच्या हाती घेण्यात येणाऱ्या बांधकामसाठी ग्रामपंचायत स्तरावरील रुपये तिन लाख व त्यापेक्षा अधिक निविदा मुल्याच्या सर्व कामासाठी ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक आहे.

ब- i) एक लाख व त्यापेक्षा अधिक किमतीच्या साहित्य खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

ii) आर्थिक वर्षात एखाद्या साहित्याचे एकूण खरेदी मुल्य एक लाख पेक्षा जास्त होणार असेले तर ई-निविदा प्रक्रियेंचा अवलंब करणे बंधकारक राहील. या बाबत अगाऊ अंदाज घेणे साठी, मागील वर्षाचा नमुना नं.६ तसेच संदर्भीत आर्थिक वर्षाच्या वार्षिक अंदाजपत्रकाचा आधार घ्यावा.

iii) साहित्य खरेदी करतांना एक लाखापेक्षा कमी किंम्मत व्हावी व केवळ ई-निविदाच्या प्रक्रियेतुन सुट मिळवण्यासाठी त्यांचे तुकडे करुन खरेदी करु नये.असे आढळुन आल्यास खरेदीची संपूर्ण रक्कम संबंधिकत ग्रामसेवक व वि.अ.(पं) यांचे कडुन वसुल करण्यात येईल.

क- i) ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी NIC ( National Informatics Center) ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करावा.

ii) अर्थात ग्राम पंचायतीने त्यांच्या निविदा फक्त http://mahatenders.gov.in या वेब साईट वरच प्रकाशीत कराव्या.किंवा http://maharashtra etenders.in या वेबसाईटचा वापर करावा.

iii) या व्यतीरीक्त अन्य वेबसाईटवर ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास सदर खरेदी प्रक्रिया अनाधिकृत ठरविण्यात येईल.

iv) ऑनलाईन ई-निविदा प्रकाशीत केल्यानंतर सर्वाधिक खपाच्या स्थानिक वृत्तपत्रात त्या बाबतची जाहिरात द्यावी.

ड- i) ई-निविदा प्रनाली अंतर्गत कंत्रादाराकडुन स्विकारावयाच्या निविदा फी , व इसारा रक्कमेसाठी भारतिय स्टेट बँक किंवा मॅपींग होणाऱ्या बँकेत स्वतंत्रखाते उघडण्यात यावे.

ii) ईसारा रक्कम निविदा फी धनादेश, धनाकर्ष (DD) स्वरुपात स्वीकारु नये. कंत्राटदारास या करीता नमुना नं.७ ची पावती देण्यात येऊ नये असे केल्याचे दिसून आल्यास सदर ई-निविदा प्रक्रिया बेकायदेशीर ठरुन ग्रा.पं.विरुध्द कार्यवाही करण्यात येईल. सदर बाबतीत ग्रामसेवक, वि.अ.(पं) व संबधित क.अभियंता यांना संयुक्तपणे जबाबदार धरण्यात येईल

iii) ई-निविदा प्रणाली अंतर्गत विकास कामाची निविदा सुचना प्रसिध्द करतांना त्या मध्ये या साठी उघडलेल्या खात्यामध्ये संबंधीत कंत्रादाराने निविदा फी व ईसारा रक्कम (EMD) RTGS/NEFT द्वारे विहीत दिनांकास जमा करण्याची अट समाविष्ट करावी.

iv) निविदा फी व ईसारा रक्कम (EMD) RTGS/NEFT द्वारे भरल्याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र (As a part of e-Tendering document and process.) संबधीत RTGS/NEFT च्या युनिक ट्रांन्जेक्शन रजिस्ट्रेशन (UTR) क्रमांक नोंदवुन, तांत्रीक लिफाफ्या सोबत अपलोड करण्यास निविदाकारांना निविदा सुचनेद्वारा सुचित करावे.

v) जे कंत्राटदार निविदा प्रक्रियेमध्ये अपात्र ठरतील, त्यांनी भरलेली ईसारा रक्कम संबधीत कंत्राटदाराच्या बँक खात्यामध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्याच्या दिनांका पासून एका महिण्याच्या कालावधीत RTGS/ NEFT द्वारे परत करण्याची जबाबदारी ग्रा.पं.सचिवाची राहील.

vi) आनलॉइन ई-पेमेंट गेट वे (e-payment Gateway) चा वापर करणे बधंकारक आहे.

Scanned by CamScanner

इ- रस्त्यांच्या कामाच्या निविदा सुचनांचा किमान कालावधी खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कामाच्या निविदेची किंमत | कमीत कमी कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम सुचना | द्वितीय सुचना | तिसरी सुचना ** |
| १ | रुपये ५.०० लाखापेक्षा कमी किंमतीची कामे | ८ दिवस | ५ दिवस | ३ दिवस |
| २ | रुपये ५.०० लाख ते रुपये १५.०० कोटी पर्यंतची किंमतीची कामे | १५ दिवस | ८ दिवस | ५ दिवस |
| ३ | रुपये १५.०० कोटीपेक्षा अधिक किंमतीची कामे | २५ दिवस | १५ दिवस | १० दिवस |

** टीप- तिसऱ्या सुचनाचे वेळी एक निविदाधारक आला तरी त्यास पात्र करावे.

फ- साहित्य खरेदीची निविदा प्रकाशीत करतांना साहित्य/ वस्तुचे अपेक्षीत वैशिष्टे (Specification) नमुद करावेत कुठल्याही एका ब्रॅन्ड साठी ई-निविदा प्रकाशीत करु नये.

ग- शासन निर्णय आमदार/ खासदार स्थानिक विकास निधी तसेच इतर योजनांचा विकास निधी यामधुन ग्रामपंचायत हद्दीमध्ये केली जाणारी अशी कामे कि, जी जिल्हा परिषद,बांधकाम ग्रा.पा.पुरवठा, सिंचन इत्यादी विभागांकडून ग्रामपंचायतीस थेट विना निवादा B-1 टेंडरद्वारे हस्तांतरीत केली जातात यांत ग्रामपंचायत "एजन्सी" म्हणुन काम करीता असल्याने अशी कामे करण्यासाठी ग्राम प्रचायतीला कामाची निविदा प्रक्रिया करता येणार नाही अर्थात पोट ठेका देता येणार नाही अशा प्रकारची कामे ग्रामपंचायतींनी स्वत: करणे बंधनकारक आहेत. अशा कामासाठी आवश्यक साहित्याच्या खरेदीसाठी नियमानुसार (१.०० लाखपेक्षा जास्त मुल्याचे) ई-निविदा प्रक्रिया करावी लागेल. मध्ये राबविलेल्या योजना/कामामध्ये अंतर्भुत असलेला नफा ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करणे बंधनकारक आहे.

ह- संदर्भ क्र. ७. शासन निर्णय, नुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर खरेदीसाठी अपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठादार असतील तर सदरच्या वस्तू व सेवांची गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर खरेदी करण्यात यावी. खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तु व सेवा रुपये ५,०००/- ते रुपये ५,०००/-पर्यंतची खरेदी, योग्य दर्जा, विनिर्देश व पुरवठा कालावधीची पुर्तता करणाऱ्या पुरवठादाराकडुन गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर करण्यात यावी.

ग्रामपंचायतीनी खरेदी करतांना परिपत्रक व शासन निर्णय यांचे तंतोतंत पालन करावे. या बाबत सचिव ग्रा.पं.यांनी दक्षता घ्यावी. नियमबाह्यरित्या खरेदी केल्यास खरेदी प्रक्रिया अवैध ठरवुन संबधीताकडुन वसुली करण्यात येईल. विस्तार अधिकारी, सहा.ग.वि.अ. व ग.वि.अ. यांनी ग्रा.पं.भेटी दरम्यान/ तपासणी दरम्यान सर्व सुचनांच पालन होते काय याची पाहणी करुन अभिप्राय नोंदवावेत.

ग्रामसेवकच्या प्रत्येक मासिक सभेत ग.वि.अ.यांनी ग्रामपंचायत निहाय्य ई-निविदाचा आढावा घ्यावा. तसेच ग्रामपंचायतीनी केलेल्या ई-निविदेची अद्यावत नोंद वही ठेवावी निविदा प्रक्रिया नियमानुसार पार पाडाव्यात आली याची खात्री करावी. गट विकास अधिकारी यांनी या बाबत सर्व ग्राम पंचायतीला अवगत करावे व परिपत्रकाची अंमलबजावणी करावी. व नियमबाह्य प्रक्रिया केली असल्यास त्या बाबत जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करावी केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल या कार्यालयास जिल्हा परिषदेस सादर करावा.

वरील सुचनांचे तंतोतंत पालन करतांना मुळ शासन निर्णय व परिपत्रकाचा बारकाईने अभ्यास करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी तसे न केल्यास त्यास संबंधित ग्रामपंचायतचे ग्रा.से./ग्रा.वि.अ., संबंधित कंनिष्ठ/शाखा अभियंता, वि.अ.(पंचायत) व सहा. गट विकास अधिकारी, गट विकास अधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

15/04/19

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

15.4.19

प्रतिलीपी-

१. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांना कार्यवाहीस्तव व माहितीस्तव.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.वाशिम यांना कार्यवाहीस्तव रवाना.
३. खाते प्रमुख ------------------------------------------------ (सर्व) यांना कार्यवाहिस्तव रवाना.
४. कार्यकारी अभियंता (बांधकाम / पाणी पुरवठा / सिंचन) जिल्हा परिषद, वाशिम/ उप अभियंता उप विभाग ---------(सर्व) यांना कार्यवाहीस्तव रवाना.
५. गट विकास अधिकारी पंचायत समिती, ---------------------------------- (सर्व) यांनी सर्व ग्रा.पं.ला सदर परिपत्रकानुसार संबधीतास कार्यवाही करण्यास अवगत करावे.
६. शाखा/कनिष्ठ अभियंता पंचायत समिती, ---------------------------------- (सर्व) यांनी सर्व ग्रा.पं.ला सदर परिपत्रकानुसार कार्यवाहीस्तव रवाना.
७. विस्तार अधिकारी(पंचायत) पंचायत समिती, ---------------------------------- (सर्व) यांनी सर्व ग्रा.पं.ला सदर परिपत्रकानुसार कार्यवाहीस्तव रवाना.
८. सरपंच/सचिव, ग्रामपंचातय, ------------------------- (सर्व) पंचायत समिती, -------------------- यांनी सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner